# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**अतिमहत्वाचे /तात्काळ**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/२४६२

दिनांक :- 17 JUL 2018

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,

पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी व्यवसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था,

**औरंगाबाद विभाग**

**विषय :-** **शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृतीची रक्कम संस्थेस देण्याकरीता लागणारे बंधपत्र तात्काळ सादर करणेबाबत.**

संदर्भ १. **म.शा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्रक.२०८/ तांशि-४ दि.२१ जुन,२०१८**

२. **या कार्यालयाचे पत्र क्रं. विकाऔ/शिक्षण/२०१८/२३५२, दि. १०/०७/२०१८**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची विदयार्थ्यांना देय असलेली रक्कम संस्थांना पूर्वीच्या प्रचलित पध्दती प्रमाणे थेट स्वरुपात अदा करण्यासाठी सोबत जोडलेले **बंधपत्र** भरुन या कार्यालयास तात्काळ सादर करणेकरीता कळविण्यांत आलेले होते.

सदर बंदपत्रात अंशत: बदल करुन रु.१००/- च्या बॉन्डपेपरवर टाईप करुन यादीसह नोटराईज्ड करुन प्राचार्यांनी तात्काळ या कार्यालयास सादर करावे.

**सदर बंधपत्र सादर केल्या शिवाय राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम आपल्या खात्यावर जमा केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

सोबत :- **बंधपत्र नमूना (सुधारीत)**

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

**"परिशिष्ट -अ"** [रु. 100 च्या बॉन्ड पेपरवर टाईप करून प्राचार्य नोटराईज्ड करावे]

(शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०८/तांशि-४ दिनांक २१ जून, २०१८ सोबतचे सहपत्र)

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शिष्यवृत्तीची अनुज्ञेय रक्कम महाविद्यालयांच्या बँक खात्यावर मिळविण्यासाठी महाविद्यालयाने द्यावयाचे बंधपत्र (Indemnity Bond)**

१) श्री............या अर्जदारांनी शिष्यवृत्तीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली सर्व माहिती, त्याच्या कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न, तो सध्या शिकत असलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, शैक्षणिक माहिती, उत्पन्नाचे विहित प्रमाणपत्र इ. तपशिल त्याच्या मूळ कागदपत्रांवरुन पूर्णपणे तपासण्यात आला असून, अर्जात नमूद केलेला तपशिल बरोबर आहे. त्यानुसार,मी,श्री./श्रीमती............................................................................................ .... (प्राचार्यांचे नाव) ...................................... या शैक्षणिक संस्थेच्या महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत असून, त्या अधिकारात उपरोक्त विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरीता शिफारस करीत आहे.

२) मी निम्नस्वाक्षरीत हमी देतो की, अर्जदारांची रक्कम जी महाविद्यालयाकडे/तंत्रनिकेतनाकडे सुपूर्द केलेली आहे, ती ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्या विशिष्ट प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करीन आणि त्याबाबीचे हिशोब ज्या प्राधिकाऱ्याने ही तरतूद सुपूर्द केलेली आहे, त्या प्राधिकाऱ्याकडे नियमितपणे पाठवेन. विद्यार्थी महाविद्यालय/तंत्रनिकेतन सोडून गेल्यास किंवा त्याने अभ्यासक्रमात बदल केल्यास किंवा अन्य कोणत्याही अनियिमिततेमुळे त्याचा प्रवेश रद्द झाल्यास, त्यास मंजूर करण्यात आलेली शिष्यवृत्तीची रक्कम सरकारी लेख्यात जमा झाल्याशिवाय त्याचा महाविद्यालय सोडल्याचा दाखला जारी करणार नाही. त्याची संपूर्ण जबाबदारी प्राचार्य या नात्याने माझ्याकडे राहिल.

३) विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, अर्जदारांनी दिलेल्या मूळ कागदपत्राचे आधारे मी तपासलेली आहे. तसेच अर्जदरानी सादर केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती तपासलेल्या असून सादर केलेल्या कागदपत्रामध्ये कोणताही बदल, खाडाखोड, दुरुस्ती वा फेरफार आढळून आलेला नाही.

४) मी निम्नस्वाक्षरीत प्रमाणित करतो की, अर्जदार हे आमचे महाविद्यालय/तंत्रनिकेतनमधील नियमित विद्यार्थी आहेत.त्यांनी कोणत्याही अन्य महाविद्यालय/तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेतलेला नाही, तसेच त्याची सरासरी उपस्थिती निर्धारित केल्याप्रमाणे आहे. तसेच सदर विद्यार्थ्याकडून महाविद्यालय/तंत्रनिकेतनाने कोणतीही शिक्षण शुल्कापोटी रक्कम घेतलेली नाही.

५) आमचे महाविद्यालय/तंत्रनिकेतन हे मान्यता प्राप्त आहे, ते अनुदानित / विनाअनुदानित आहे, मान्य झालेले अभ्यासक्रम हे संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्यानी मान्यता दिलेले आहेत. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता ही सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या मान्यतेनुसारच असून, त्या प्रवेशक्षमतेच्या अधिन राहून

पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधीत सक्षम कार्यालयास पाठविलेले आहेत. त्यांचे शिक्षण शुल्क संबंधीत सक्षम प्राधिकरण/विद्यापीठ यांनी मान्य केल्याप्रमाणेच असून ती अवास्तव किंवा अवाजवी नाहीत. शासन/ विद्यापीठ/ सक्षम प्राधिकारी यांचे प्रचलित नियम व अटी यांचे पालन करुन व त्यामधील नियम, अटी व शर्तीच्या अधिन राहून विद्यार्थ्यांचा अर्ज योग्य व नियमानुसार असून, त्याची शिष्यवृत्तीची देय रक्कम, महाविद्यालय/तंत्रनिकेतनाच्या बँक खात्यावर जमा होणेसाठी शिफारस करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता, उणीवा व गैरप्रकार झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही महाविद्यालय/तंत्रनिकेनाची असेल.

जावक क्रमांक ...................

दिनांक ......................

ठिकाण ..........................

प्राचार्याची स्वाक्षरी .................

संपूर्ण नाव ...........................

महाविद्यालयाचा शिक्का